Remove Watermark Wondershare PDFelement

जळगाव : दि.०५ (प्रतिनिधी) खान्देशात नवउद्योजक घडवण्यासाठी विद्यापीठाकडून पुर्णत: सहकार्य देण्यात येईल असे प्रतिपादन प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या इनोव्हेशन इन्क्युबेशन अँड लिंकेजेस केंद्राच्यावतीने आयोजित नवउद्योजक कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. भारतीय स्वांतत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त या केंद्राच्यावतीने आजी-माजी विद्यार्थी मात्र जे नवउद्योजक होऊ पहात आहेत त्यांच्याकडून नाविण्यपूर्ण कल्पना मागविण्यात आल्या होत्या. यातील २३ नवउद्योजकांना तीन दिवस निवासी कार्यशाळेत तज्ज्ञामार्फत मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेचा समारोप प्रा. इंगळे यांच्या उपस्थितीत झाला. भविष्यात आवश्यक त्यावेळी विद्यापीठाकडून पुर्ण सहकार्य केले जाईल असे आश्वासन त्यांनी दिले. समारोप कार्यक्रमाचे सुत्रसंचालन समन्वयक केवल थोरात यांनी केले. सागर पाटील यांनी आढावा घेतला. संचालक डॉ. राजेश जावळीकर यांनी आभार मानले. त्याआधी सकाळच्या सत्रात आशुतोष प्रचंड यांनी बौध्दिकसंपदा हक्क याविषयी मार्गदर्शन केले. राकेश कासार यांनी कंपनी स्थापन करण्याचे विविध प्रकार व त्यांच्या कायदेशीर प्रक्रिया समजावून सांगितल्या. या केंद्राव्दारे स्टार्टअप सुरू केलेल्या गोविंदा सोनवणे यांनी वाळलेल्या फुलांपासून अगरबत्ती तयार करण्यापर्यंतचा त्याचा प्रवास या नवउद्योजकांना सांगितला. सागर पाटील यांनी आपल्या कल्पनेला बिझनेस मॉडेलमध्ये कशा प्रकारे रूपांतरीत करावे याबाबतीत मार्गदर्शन केले.

खान्देशातील ज्या नवउद्योजकांना नाविण्यपुर्ण कल्पना असलेले उद्योग सुरू करावयाचे आहेत त्यांनी विद्यापीठातील या केंद्राच्या ०२५७-२२५७४४८ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन केंद्राच्यावतीने करण्यात आले आहे.

-----------------------------------------------------------------------------------

प्रति,

मा. संपादक/प्रतिनिधी,

कृपया, आपल्या लोकप्रिय दैनिकातून उपरोक्त बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ. सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

Wondershare PDFelement